# ।। गृह संतोष को अंग ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:- रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

* वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ गृह संतोष को अंग लिखंते ।।

।। कवत ।।

सुण ब्रम्हा घर नार ।। नार सिवजी संग होई ।।
म्हा बिस्न घर नार ।। नार गणपत घर दोई ।।
चांद सुर्ज घर नार ।। नार ब्यास संग जाणो ।।
राम किस्न औतार ।। ताय संग ब्होत बखाणो ।।
सुर तेतिसूं देवता ।। सब घर नारी जोय ।।
अे तामे सुखराम के ।। कोहो कुण निरसा होय ।।१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज त्यागीस बोलले की,अरे त्यागी,ब्रम्हाच्या घरी सावित्री,शंकराच्या घरी पार्वती ह्या स्त्रीया आहेत.महाविष्णूच्या घरी लक्ष्मी ही त्याची पत्नी आहे.गणपतीच्या घरी रिध्दी सिध्दी दोन पत्न्या आहेत.चंद्राच्या घरी अश्विनी पकडून सत्तावीस दक्ष राजाच्या मुली आहेत.सुर्याच्या घरी संज्ञा स्त्री आहे.व्यासाच्या घरी वटीका आणि वृत्ता,अप्सरा ह्या स्त्रीया आहेत.रामचंद्रा सोबत सिता स्त्री होती. कृष्णासोबत खुप स्त्रीया होत्या.सर्व देवता ३३,००,००,००० आहेत.सर्वांच्या घरी स्त्रीया आहेत.या सर्वांमध्ये तुला तुझ्याहून कोण कमजोर,हलके दिसून राहीले आहे. ।।१।।

बाष्ट मुनि घर नार ।। पुत्र साठ ऊण जाया ।।
पांडू पाँचू जाण ।। नार परणी घर लाया ।।
कर्दम मुनि घर नार ।। नार पीरा संग होई ।।
रूषभ देव स्हेदेव ।। नार बिन रहया न कोई ।।
अे घरबारी सब हुवा ।। हर भज ऊतऱ्या पार ।।
अेता सूं सुखराम के ।। कुण इधको संसार ।।२।।

अरे त्यागी,वशिष्ठ मुनीच्या घरी अरुणधती व उर्जा अशा दोन पत्न्या होत्या.त्यांच्या पासूनवशिष्ठाला साठ पुत्र जन्मले.पाची पांड्वांनी द्रोपदीशी विवाह करुन घरी आणले. कर्दम मुनीच्या घरी देवहूती स्त्री आहे.पिरांसोबत स्त्रीया होत्या.ऋषभदेवाच्या घरी जयंती, सहदेवाच्या घरी कविजया होती.हे सर्व स्त्रीयांशिवाय नाही राहीले.हे सर्व गृहस्थी होते. ते सर्व ब्रम्हमध्ये जाऊन मिळून गेले.रामनामाचे भजन करुन पार उतरुन गेले.आदि सतगुरु सुखरामजी महाराज त्यागीला विचारत आहेत की,तु पत्नी त्यागली,गृहस्थ जीवनाला हलके समजेल तर काय यांच्याहून काही अधिक आहे? ।।२।।

जनक बदे घर नार ।। सेंस दस खवासाँ जाणो ।।
फिर राजा अमरिष ।। ताँय संग ब्होत बखाणो ।।
जमदग्न घर नार ।। नार संक्र रिष धारी ।।

देव निरंजण आप ।। ताय ले सुन्न बिचारी ।।
अे घर बारी सब हूवा ।। मिल्या ब्रम्ह मे जाय ।।
क्या ओगण सुखराम के ।। सुण त्यागी घर माय ।।३।।

अरे त्यागी,राजा जनक विदेहीच्या घरी सुनयना पत्नी होती व दहा हजार रखेल होत्या.अमरिष राजाच्या घरी खुपश्या स्त्रीया होत्या.जमदग्नी ऋषीच्या घरी रेणुका स्त्री होती.शंकराचार्यच्या घरी स्त्री होती.स्वत: निरंजन देवाच्या घरी ब्रम्हशुन्य ही पत्नी आहे.तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की हे सर्व गृहस्थी होते व ब्रम्ह मध्ये जाऊन मिळून गेले.तर गृहस्थीपणात काय अवगुण आहे. तुम्ही घर आणि घरच्या स्त्रीचा त्याग करुन दिला. ।।३।।

कुंडल्यो ।।

ब्रम्ह सदाई अमर रे ।। जाका क्हाँ बखाण ।।
माया अमर धाम हे ।। सो नर ईधकी जाण ।।
सो नर ईधकी जाण ।। ब्रम्ह तो डिगेन कोई ।।
जो माया तज जाय ।। अरथ बिन निकमो होई ।।
सुखराम हद बेहद लग ।। जनम मरण गत जाण ।।
ब्रम्ह सदाई अमर रे ।। ज्हाँ क्हाँ बखाण ।।४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी त्यागीला सांगितले की सतस्वरुप ब्रम्ह हा सदा अमर आहे.त्याचे वर्णन करता येत नाही.या सतस्वरुप ब्रम्हामध्ये अमर माया,बिना सुखवाला सुखाचा पारब्रम्ह व महाप्रलयांत नष्ट होणारी माया आहे.सतस्वरुप ब्रम्हच्या या सर्व धामांमध्ये अमर मायेचे धाम सर्वात उंच व सदा सुख देणारे आहे.हे त्यागी,या अमर मायेला सर्वात जास्त पकड,त्याला प्राप्त कर.सतस्वरुप ब्रम्ह तर कधी कमी होतच नाही.तो सदा सारखा राहतो.जसे सतस्वरुप ब्रम्ह कमी जास्त होत नाही.असेच सतस्वरुप माया कमी जास्त होत नाही.सदा एकसारखी राहते.कमी जास्त तर त्रिगुणी मायेचे सुख सृष्टी होते.म्हणून त्रिगुणी मायेच्या सृष्टीला त्याग व सतस्वरुपाच्या सतमायेच्या सृष्टीला प्राप्त कर.ब्रम्हज्ञानात पारब्रम्ह प्राप्त करण्याकरीता माया त्यागावी लागते.असे ब्रम्हज्ञानी हंस सतस्वरुपाच्या पारब्रम्हमध्ये जेथे सुख नाही अशा पदात पोहचतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराजांच्या ज्ञानात कोणती माया त्यागावी लागत नाही व संत जेथे सदा सुख आहेत तेथे पोहचतो म्हणून त्यागीला आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले,पारब्रम्हचे बीज धारण केले व तुला येथे माया त्यागावी लागली तर तू बीजाची फरक समज.दोन्ही भक्तीचे संत बीज सतस्वरुप ब्रम्हमध्येच पोहचवितात.परंतु माया त्यागणारे बीज जेथे सुख नाही अशा सतस्वरुपाच्या पारब्रम्ह

पदात पोहचवितो व माझा माया सुख घेणारा बीज सतस्वरुप ब्रम्हच्या अमर माया पदात पोहचवितो म्हणून जो मायेचे सुख त्यागून पारब्रम्हचे बीज धारण करतो तो सुखाकरीता येथे ही बिन कामाचा होऊन जातो व सतस्वरुपाच्या पारब्रम्ह पदात पोहचल्यावरही बिन कामाचा होऊन जातो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले हद म्हणजे ब्रम्हा,विष्णू,महादेवच्या पदापर्यंत जा किंवा बेहद म्हणजे सतस्वरुप मायेच्या अमर मायेच्या पदापर्यंत जा.सुख घेतल्यानेच गती होते म्हणजे जन्म घेतल्यापासून मरेपर्यंत मायेने गती होते म्हणजे मायेने सुखाचे पद मिळते.माया त्यागल्याने होत नाही. ।।४।।

।। इति अथ गृह संतोष को अंग संपूरण ।।